प्रेस नोट दि.१४/०४/२०२०

**आंतरजिल्हा प्रवासासाठी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाकडून ई-पास देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.**

कोरोना संसर्गाच्या अनुषंगाने दि. ३०/०४/२०२० रोजी पर्यंत लॉकडाऊन घोषीत करण्यात आले आहे. सदर काळात वैद्यकीय अथवा मृत्यू अथवा इतर अत्यावश्यक आपत्कालीन कारणास्तव पिंपरी चिंचवड आयुक्तालय हद्दीतून महाराष्ट्रातील इतर जिल्हयात जाण्यासाठी ई-पास उपलब्ध करण्यात येत आहेत. त्याकरीता नागरिकांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करुन ई-पास प्राप्त करुन घ्यावेत.

❖ **ई- पास सुविधाः-**

१) आंतरजिल्हा प्रवासासाठी https://covid19.mhpolice.in या वेबसाईटवर जाऊन पिंपरी चिंचवड पोलीस येथे स्वतः रजिस्टर होऊन आवश्यक ते कागदपत्र व फोटो अपलोड करून ऑनलाईन अर्ज करावा.

२) अर्ज भरताना अत्यावश्यक सेवा कारण/ उद्देश येथे आपला आंतरजिल्हा प्रवास करण्याचा उद्देश स्पष्ट लीहावा.

३) आंतरजिल्हा प्रवास प्रारंभ ठिकाण व प्रवासाचे अंतिम ठिकाण स्पष्ट लिहीणे अत्यावश्यक आहे.

४) योग्य कागदपत्रे जोडणे अत्यावश्यक आहे.

५) ऑनलाईन अर्ज केल्यानंतर संबंधितांना टोकन अदा करण्यात येईल. (सदरचा टोकन क्रमांक जपुन ठेवावा. जेणेकरून आपल्या अर्जाची सद्यस्थिती जाणून घेण्यास मदत होईल.)

६) पोलीसांकडून कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतरच ई-पास अदा करण्यात अथवा नाकारण्यात येईल.

७) आपल्याला मिळालेल्या टोकनद्वारे अर्जाची सद्यस्थिती तपासताना अर्ज मंजूर झाला असल्यास वेबसाईटवरूनच आपला ई-पास डाऊनलोड करावा.

८) ई-पास मिळाल्यानंतर त्याची सॉफ्ट कॉपी व हार्ड कॉपी संबंधितांनी जवळ ठेवावी. पोलीस नाकाबंदी ठिकाणी मागितल्यानंतर तेथे दाखवावी.

९) **सदरचे ई – पास हे फक्त आंतरजिल्हा प्रवासासाठीच ऑनलाईन मिळतील.**

१०) **पिंपरी चिंचवड व पुणे येथे जाण्या-येण्यासाठी लागणारे अत्यावश्यक अंतर्गत पास हे वरील वेबसाईटवर अर्ज करून दिले जाणार नाहीत. सदरची वेबसाईटचा वापर फक्त आंतरजिल्हा ई-पास मिळणेसाठीच करावा.**

११) पिंपरी चिंचवड व पुणे येथे जाण्या-येण्यासाठी लागणारे अत्यावश्यक अंतर्गत पास हे पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-१, व पोलीस उपआयुक्त परिमंडळ-२ यांचे कार्यालयातून अर्ज केल्यानंतर मिळतील. परिमंडळ १ साठी dcpzone1.pcpc-mh@gov.in किंवा मो.क्र. 9834957526 तसेच परिमंडळ २ साठी dcpzone2.pcpc-mh@gov.in किंवा मो.क्र. 9529861471 यावर योग्य त्या कागदपत्रांसह अर्ज करावेत.

१२) आंतरराज्यीय प्रवासासाठीचे पास हे पोलीस आयुक्त कार्यालय पिंपरी चिंचवड येथून दिले जात नाहीत.

१३) आंतरराज्यीय प्रवासासाठी योग्य त्या कारणांसह आपले अर्ज covid19mpass@gmail.com या ई-मेल आयडी वर करावेत. सदरचे पास हे पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई येथून दिले जातात.

(श्रीधर जाधव)
सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे-२
पिंपरी चिंचवड.